## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(सकाळ)

जा.क्र. २६/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ११/०१/२०१७

**१) अल्पवयीन मुलीचा विनयभंग करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १०/०१/२०१७ चे १४.०० वाजे पर्यन्त यातील आरोपी हा मोटार सायकलने फिर्यादीचा पाठलाग करुन तिला एकांतात रस्त्यात अडवुन तुझ्यावर मी प्रेम करतो असे म्हणुन फिर्यादीने नकार दिला असता तिला शिविगाळ करुन जिवाने मारण्या पिटण्याची धमकी दिली व फिर्यादीवर पाठत ठेवुन फिर्यादीचे घरात जावुन तिला लाथा बुक्यांनी मारपीट केली व घरच्या लोकांना सुध्दा जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे मनात भय निर्माण झाल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३५४(ड),४५२,३४१,३२३,५०४,५०६ भादवी.सहकलम ११(४),१२ बा.लै.सरक्षण कायदा २०१२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. गदादे पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**२) संगनमत करुन महीलेचा विनयभंग केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०८/०१/२०१७ चे २४.०० ते ९/०१/२०१७ चे १०.०० वा दर. यातील फिर्यादी ही आपल्या घरी एकटीच दार बंद करुन झोपली असता यातील आरोपीतांनी संगनमत करुन घरात प्रवेश करुन झोपेत असलेल्या फिर्यादीचे, हात, पाय, छाती दाबुन विनयभंग केला व ति ओरडली असता पळुन गेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३५४,४५२,३४भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. रायपुरे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**३) मोटार सायकल चालकांच्या निष्काळजीपणामुळे एक गंभिर जखमी . :–**

दिनांक ०९/०१/२०१७ चे १९.०० वा. दर. यातील फिर्यादी हा दुचाकी मोटार सायकल क्र. एम एच ३६ यु ३८८६ ने त्याचे चुलत भावासोबत लाखनी वरुन साकोली कडे येत असता तेली नाल्यासमोर चौपदरी डांबरी रोडवर रुमाल खाली पडल्याने गाडी थांबवुन रुमाल उचलत असतांना मागेहुन येणाऱ्या आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील मोटार सायकल भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीचे मोटार सायकलला मागेहुन धडक दिल्याने फिर्यादीचा चुलत भाऊ पदमाकर ताराचंद मांढरे वय ३१ वर्ष, रा. रेंगेपार यास गंभिर जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी घनश्याम उर्फ गोपीचंद मांढरे वय २५ वर्ष, रा. रेंगेपार/ कोहळी यांचे तोंडी व वैदयकिय अहवाला वरुन पोस्टे साकोली कलम २७९,३३७,३३८ भांदवी. आर डब्यु १८४ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मेश्राम पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

**४) घराच्या आवारातुन ट्रॅक्टरची चोरी . :–**

दिनांक ०९/०१/२०१७ चे २२.०० ते १०/०१/२०१७ चे ०६.०० वा. पर्यत. यातील फिर्यादी विजय कुमार शालीकराम चांदेवार वय ४२ वर्ष, रा. प्रगती कॉलोनी सेंदुरवाफा याचा बिना नंबरचा ट्रॅक्टर आयसर कंपनीचा सिल्वर रंगाचा मॉडेल नं. ३३३(इंजीन) कि. ५,२०,०००/–रु. चा अंगनात ठेवला असतांना फिर्यादीने सकाळी उठुन ट्रॅक्टर पाहीले असता दिसुन न आल्याने कोणीतरी अज्ञात चोराने सुना मौका पाहुण चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोस्टे साकोली कलम ३७९ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. वानखेडे पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५७०९९१२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.